**सं. फौ. ख. क्रं. २८३/२०२५**

**शासन वि. मनोरमा**

**प्ली लगत निशाणी क्र १०**

MHYA130005152025

| | |
|---|---|
| सं.फौ.ख.दाखल दिनांक | ०७/०४/२०२५ |
| सं.फौ.ख.नोंद दिनांक | ०९/०४/२०२५ |
| सं.फौ.ख.निकाल दिनांक | २६/०५/२०२६ |
| कालावधी | ०१ वर्षे ०१ महिने १७ दिवस |

## न्यायनिर्णय

( घोषित दिनांक २६/०५/ २०२६)

आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये शिक्षेस पात्र अपराधांबाबत संपरिक्षा चालविण्यात आली आहे.

२. अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता श्री. ए. आर. राऊत व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस. जी. तुपसुंदरे यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

३. प्रकरणातील मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे देत आहे.

| अ. क्रं | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, दि. ३०/०३/२०२५ रोजी १७.०० ते १८.०० वाजण्याच्या सुमारास मौजे–आष्ठा, ता. दिग्रस, जि. यवतमाळ येथे राहत्या घरामध्ये आरोपी विनापरवाना व बेकायदेशीरित्या मोहा सडवा व गावठी हातभट्टीची दारु जवळ बाळगून त्यांची चोरटी विक्री करत असताना मिळून आला आणि महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा केला ? | नाही |

| अ. क्रं | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| २ | काय आदेश ? | अंतीम आदेशाप्रमाणे |

## का र ण मि मां सा

४. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द ठेवलेला दोष सिध्द करण्यासाठी केवळ दोन साक्षीदार तपासले आहे. ते म्हणजे वर्दीदार श्री. मोरेश्वर रामचंद्र राठोड व जप्ती/घटनास्थळ पंच मोहसिन खान नसिम खान पठान हे आहेत. अभियोगपक्षाने निशाणी क्र. १४ वरील वर्दी व निशाणी १५ वरील एफ. आय. आर. यावर आपली भिस्त ठेवली आहे.

**मुददा क्रं. १ बाबत...**

५. अभियोग पक्षातर्फे वर्दीदार श्री. मोरेश्वर रामचंद्र राठोड यांच्या पुराव्यात असे सांगितले आहे की, दि. ३०/०३/२०२५ रोजी ते दिग्रस पोलिस ठाणे येथे बिट जमादार म्हणुन कार्यरत होते. त्यांच्या सोबत कैलास देवकर व ते छापा मारण्याकरीता गेले होते. त्यांना खात्रीलायक माहिती मिळाली त्यावरुन त्यांनी आष्टा येथे आरोपीच्या घरी छापा मारला असता, आरोपीच्या ताब्यातून देशी दारुच्या २० बाटल्या मिळाल्या.

त्यापैकी ९० एम. एल. रासायनिक विश्लेषन अहवालाकरीता राखुन ठेवला. त्यांनी त्यांच्या वर्दीप्रमाणे साक्ष दिल्याचे दिसुन येते. त्यामुळे अभियोग पक्षाने निशाणी २६ वरील वर्दी शाबित केली.

६. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ श्री. मोरेश्वर रामचंद्र राठोड यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, आरोपीच्या ताब्यातून देशी दारुच्या २० बाटल्या मिळाल्या. त्यापैकी त्यांनी त्यातील ९० एम. एल. नमुना रासायनिक विश्लेषन अहवालाकरीता राखुन ठेवल्याचे नमुद केले. सदरील घटनास्थळ व जप्ती पंचनामा दोन पंचासमक्ष केला. परंतु श्री. मोहसिन खान नसिम खान पठान (सा. क्र. २) हे जप्ती/घटनास्थळ पंचनाम्यातील पंच साक्षीदार असुन त्यांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नाही. त्यामुळे सरकारी वकील यांनी सदर साक्षीदाराला उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारले आहेत. परंतु त्यामधून अभियोग पक्षास उपयुक्त असा कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे त्यांचा पुरावा अभियोग पक्षाच्या उपयोगाचा नाही. त्यामुळे अभियोग पक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा शाबित करु शकला नाही.

७. तसेच अभियोग पक्षाने याप्रकरणी रासायनिक विश्लेषणाचा अहवाल दाखल केला नाही. त्यामुळे कथीतरित्या जप्त केलेले पदार्थ हे मादक पदार्थ होते असे दाखवणारा कोणताही पुरावा अभिलेखावर येउ शकला नाही. प्रस्तूत खटल्यात

अभियोग पक्षाला पुरेशी संधी देवूनही इतर साक्षीदारांचा पुरावा देण्यास अभियोग पक्ष असमर्थ ठरला आहे. याउलट अभियोग पक्षाने नि. क्र. ०१ वर त्यांचा पुरावा बंद केल्याचे नमूद केले.

८. वरील बाबी, परिस्थीती व न्यायालयीन अभिलेखावर उपलब्ध असलेला पुरावा विचारात घेतला असता आरोपीविरुध्द न्यायालयीन अभिलेखावर कोणताही दोषात्मक पुरावा आढळुन आला नसल्याचे दिसुन येते. अभियोग पक्ष आरोपीविरुध्द सदर गुन्हा शाबीत करण्यास अपयशी ठरला आहे. त्यामुळे मुददा क्रं. १ चे उत्तर मी नकारार्थी नोंदविले आहे.

**मुददा क्रं. २ बाबत...**

९. मुददा क्रं. १ च्या निष्कर्षप्राप्तीनुसार महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये शिक्षेस पात्र अपराध आरोपीविरुध्द सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरल्यामुळे सदर अपराधामधुन सदर आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. त्यामुळे मुद्दा क्र. २ करिता मी खालील आदेश पारित करीत आहे.

**सं. फौ. ख. क्रं. २८३/२०२५**
**शासन वि. मनोरमा**
**प्ली लगत निशाणी क्र १०**

# <u>आदेश</u>

**१.** आरोपी– मनोरमा मंगल लंबे यांची महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये शिक्षेस पात्र अपराधांसाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८(अ) अन्वये **निर्दोष मुक्तता** करण्यात येते.

**२.** आरोपीचे बंधपत्रे व जामीनपत्रे रद्द करण्यात आले आहेत.

**३.** जप्त मुद्देमाल कायदयाप्रमाणे विल्हेवाट लावण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क, यवतमाळ यांच्याकडे अपील कालावधीनंतर सोपवण्यात येते.

**४.** भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ४८१, अन्वये आरोपीने रु. १५,०००/– चे बेल बॉन्ड जमा करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by BALAVIR NARAYAN GODBOLE
Date: 2026.05.26 15:36:43 +0530

ठिकाणः दिग्रस. **( बा. ना. गोडबोले )**

दि. २६/०५/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दिग्रस.

सं. फौ. ख. क्रं. २८३/२०२५
शासन वि. मनोरमा
प्फी लगत निशाणी क्र १०

:: **<u>Certificate of Stenographer</u>** ::

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Order."

Dictated On : 26/05/2026.
Transcribed On : 26/05/2026.
Checked & Signed On : 26/05/2026.
Date : 26/05/2026.
Place : Digras

**Sd/-**
**( N. S. Jadhao )**
Steno Grade-3
C.J.J.D. & J.M.F.C., Digras.